महाशिवरात्री निमित्त आळंदी पंचक्रोशी शिव मंदिरात भाविकांची गर्दी

आळंदी / प्रतिनिधी

अलंकापुरी पंचक्रोशीतील विविध तसेच माऊली मंदिरातील पुरातन श्री सिद्धेश्वर, श्री काशीविश्वेश्वर, श्री काळ भैरवनाथ दीर, श्री वैतागेश्वर महाराज मंदिर, श्री वाघेश्वर महाराज मंदिर, श्री महादेव बेली आदी शिवमंदिरांत महाशिवरात्र परंपरेने मोठ्या भक्तिमय उत्साहात धार्मिक मंगलमय वातावरणात महाशिवरात्र साजरी करण्यात आली.

येथील अलंकापुरी पंचक्रोशीतील विविध तसेच माऊली मंदिरातील पुरातन श्री सिद्धेश्वर, श्री काशीविश्वेश्वर, श्री काळ भैरवनाथ दीर, श्री वैतागेश्वर महाराज मंदिर, श्री वाघेश्वर महाराज मंदिर, श्री महादेव बेली आदी शिवमंदिरांत महाशिवरात्र परंपरेने मोठ्या भक्तिमय उत्साहात धार्मिक मंगलमय वातावरणात महाशिवरात्र साजरी करण्यात आली.

शिवरात्री दिनी विविध व्रत, उपवास करीत आळंदी पंचक्रोशीतील शिव मंदिरांत महाप्रसादाचे वाटप करत साजरी करण्यात आली. महाशिवरात्री निमित्त आळंदी मधील पुरातन वैतागेश्वर मंदिरात देखील परंपरेने महाशिवरात साजरी करण्यात आली. येथे अतुल लोणकर यांचे वतीने महाप्रसाद वाटप करण्यात आला. येथील जय गणेश मंदिरात शिरात्री निमित्त धार्मिक कार्यक्रम करत दूध महाप्रसाद वाटप झाले. आळंदी पंचक्रोशीतील शिवमंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम झाले. माऊली मंदिरात हजारो भाविकांनी रांगा लावून श्रींचे दर्शन घेतले. आळंदी पंचक्रोशीतील शिवमंदिर श्री वाघेश्वर महाराज मंदिर, श्री नागेश्वर महाराज मंदिर, श्री धनेश्वर महाराज मंदिर, श्री चक्रेश्वर महाराज मंदिर, वडगाव घेनंद येथील पुरातन पांडव कालीन श्री बेली महादेव मंदिर आदी मंदिरात भक्तांनी दर्शनासाठी अलोट गर्दी केली होती. तसेच येथील माऊली मंदिरात असणारे पुरातन श्री सिद्धेश्वराचे मंदिर, आळंदीतील सिध्दबेटातील शिव मंदिरात देखील भाविकांनी गर्दी केली होती. येथील मंदिर परिसर भाविकांच्या गर्दीने फुलला होता. शिवभक्तीमय वातावरण सर्वत्र पाहण्यास मिळाले. भाविकांचे गर्दीने मंदिर प्रागंण फुलून गेले होते. परिसरातील शिवमंदिरात भक्तांनी दिवसभर दर्शनासास गर्दी केली होती. माऊली मंदिरात भक्तांचा उत्साह होता. भक्तांचे दर्शनास व्यवस्था आळंदी देवस्थानचे मुख्य व्यवस्थापक माऊली वीर, उपव्यवस्थापक तुकाराम माने यांनी सेवक कर्मचारी, सुरक्षा रक्षक यांचे सहकार्याने उत्तम ठेवली. कमी वेळेत जास्तीत जास्त भाविकांना श्रींचे दर्शनाचा लाभ देण्यात आल्याचे व्यवस्थापक माऊली वीर यांनी सांगितले. माऊली मंदिरात पहाटे श्रीना अभिषेख पूजा, महानैवेद्य, कीर्तन, ११ ब्रम्हवृंदांचे वतीने महाशिवरात्रीचा रुद्राभिषेख प्रमुख विश्वस्त योगी निरंजन नाथ गुरु शांतीनाथ यांचे हस्ते मंदिरातील परंपरेने होत आहे.

विविध ठिकाणी मसाले दुध, फराळाचे महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

आळंदी देवस्थान तर्फे देखील महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. काळेवाडी येथील श्री काशीविश्वेश्वर शिव मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम शिवलिलाअमृत पारायण, महाप्रसाद वाटप, कीर्तन, पारायण सेवा झाली. यासाठी संयोजन सुवर्णाताई काळे, मेघाताई काळे यांनी केले. यावेळी परायणासह महापूजा अभिषेख पूजा उत्साहात झाली. यासाठी महिलांची मोठी उपस्थिती होती. यावेळी श्री ज्ञानेश्वर महाराज चरित्र समिती अध्यक्ष प्रकाश काळे, महिला बचत गट महासंघ अध्यक्षा सुवर्णा काळे, बाबुलाल काळे, आळंदी जनहित फाउंडेशनचे कार्याध्यक्ष अर्जुन मेदनकर, गोविंद ठाकूर तौर, बंडूनाना काळे आदींसह भाविक उपस्थित होते. यावेळी प्रकाश काळे यांचे हस्ते श्रींची आरती झाली. दुपारी ज्ञानाई भजनी मंडळ, वाघजाई भजनी मंडळाची हरिनाम गजरात भजन सेवा कार्यक्रम झाला. हरिपाठ उत्साहात झाला. महाशिवरात्री निमित्त विवेकानंद महाराज गिरी यांची सुश्राव्य कीर्तन सेवा झाली.

थोडक्यात

शिक्षकाकडून विद्यार्थिनीचा विनयभंग

शिक्रापूर : कोळगाव डोळस येथील घडलेल्या घटनेबाबत गटशिक्षणाधिकारी बाळकृष्ण कळमकर यांच्याशी संपर्क साधला असताना सदर घटनेबाबत शिक्षण विभागाने चौकशी समिती नेमली असून चौकशी अहवाल नंतर त्या शिक्षकावर निलंबनाची कारवाई केली जाणार असल्याचे गटशिक्षणाधिकारी बाळकृष्ण कळमकर यांनी सांगितले.

शिरुर तालुक्यातील कारेगाव येथे काही दिवसांपूर्वी जिल्हा परिषद शाळेतील शाळकरी मुलींचा विनयभंग शिक्षकाने विनयभंग केल्याची घटना ताजी असताना नुकतेच कोळगाव डोळस येथे शिक्षकाने अल्पवयीन शाळकरी मुलीचा विनयभंग केल्याची घटना घडली असल्याने शिरुर पोलीस स्टेशन येथे बाळासाहेब धोंडीबा गुंजाळ या शिक्षकावर बाल लैंगिक अत्याचार प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कोळगाव डोळस ता. शिरुर येथील जिल्हा परिषद शाळेतील पिडीत मुलगी काही मानसिक तणावात राहत शाळेमध्ये जाण्यास नकार देत असल्याने मुलीच्या पालकांनी तिला विश्वासात घेऊन विचारपूस केली असता शाळेतील गुंजाळ गुरुजी हे शाळेच्या ऑफिसमध्ये बोलावून घेऊन झाडू मारण्यास सांगून अश्लील गैरवर्तन करत असून वेळोवेळी पट्ट्याने मारण्याची धमकी असल्याचे पालकांना सांगितले, मुलीने सांगितलेल्या प्रकाराने पसंतप्त पालकांनी शाळेमध्ये जात संताप व्यक्त केला, तर याबाबत पालकांनी शिरुर पोलीस स्टेशन फिर्याद दिल्याने पोलिसांनी बाळासाहेब धोंडीबा गुंजाळ रा. कोळगाव डोळस ता. शिरुर जि. पुणे या शिक्षकावर बाल लैंगिक अत्याचार प्रकरणी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक हनमंत गिरी हे करत आहे.

पर्समधून सोन्याच्या गंठण ची चोरी

मंचर / प्रतिनिधी

रुग्णालयात दाखल केलेल्या रुग्णाच्या गळ्यातील गंठण पर्स मध्ये ठेवले असता पर्समधील गंठण अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना सेवन सिटी हॉस्पिटल मध्ये घडली आहे. याबाबत ज्ञानेश्वर मारुती कडलक यांनी मंचर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून अज्ञात चोरट्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की फिर्यादी ज्ञानेश्वर कडलक यांची पत्नी अनिता हिला दिनांक ४/२/२५ रोजी दुपारी उलटी होऊन त्रास झाल्याने तिला सेवन सिटी हॉस्पिटल मंचर येथे उपचारा कामी चार वाजताच्या दरम्यान दाखल करण्यात आले होते. त्यावेळी तिने तिच्या गळ्यातील पाच तोळे वजनाचे सोन्याचे गंठण काढून पर्समध्ये ठेवले होते. दुसऱ्या दिवशी अनिता कडलक यांना आय सी यू मध्ये शिफ्ट केले असता त्यांनी त्यांच्याजवळील गंठण असलेली पर्स त्यांची मुलगी नित्या हिच्या जवळ दिली होती. फिर्यादी ज्ञानेश्वर कडलक हे पत्नीला ज्यूस घेऊन आले असता त्यांच्या मुलीने पर्स व्हॅगनार गाडीत ठेवली होती. त्यानंतर रात्री साडेदहा वाजलेच्या दरम्यान ते घरी निघाले असता त्यांच्या मुलीने बॅगेत गंठण आहे की नाही हे पाहण्यास सांगितले त्यावेळी मुलगा प्रतीक व पुतण्या विशाल यांनी पर्स चेक केली असता त्यात गंठण मिळून आले नाही. त्यांनी हॉस्पिटलमध्ये जाऊन इतर बॅगा चेक केल्या परंतु गंठण मिळून आले नाही कुणीतरी अज्ञात व्यक्तीने पाच डोळे वजनाचे १ लाख ७८ हजार ८६८ रुपये किमतीचे गंठण चोरून नेल्याचे त्यांच्या लक्षात आले. याबाबत ज्ञानेश्वर कडलक यांनी मंचर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केलेल्या फिर्यादीनुसार अज्ञात चोरट्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास मंचर पोलीस करत आहे.

शिवशाही बसमध्ये प्रवासी तरुणीवर बलात्कार

स्वारगेट डेपोमधील २३ सुरक्षा रक्षकांचे तात्काळ निलंबन

पुणे / प्रतिनिधी

स्वारगेट डेपोमधील २३ सुरक्षा रक्षकांचे तात्काळ निलंबन करण्यात आले आहे. उद्यापासून नवीन सुरक्षा रक्षक कामावर रुजू करण्याचे आदेश परिवहन मंत्र्यांकडून देण्यात आले आहेत.

गावाला निघालेल्या तरुणीला धमकावून शिवशाही बसमध्ये बलात्कार करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. बुधवारी सकाळी साडेपाचच्या सुमारास ही घटना घडली. पोलिसांनी आरोपीचे नाव निष्पन्न केले असून त्याचा शोध घेण्यास पोलिसांची आठ पथके रवाना झाली आहेत.

दत्तात्रय रामदास गाडे (वय ३५, रा. शिक्रापूर) असे आरोपीचे नाव आहे. त्याच्याविरुद्ध जबरी चोरीचे दोन गुन्हे दाखल आहेत.

याबाबत पोलीस उपायुक्त स्मार्तना पाटील यांनी सांगितले पीडित २६ वर्षाची तरुणी फलटणला जाण्यासाठी पहाटे साडेपाच वाजण्याच्या सुमारास स्वारगेट बसस्थानकावर आली. तिला एकाने फलटणला जाणारी गाडी इकडे लागत नाही. तिकडे लागते, असे सांगितले. त्यावर या तरुणीने इकडेच फलाटावर लागते, असे सांगितले. त्यावर त्याने तिच्याशी गोड बोलून तिला मी १० वर्षे इथे आहे. तिकडे लागणारी बसच फलटणला जाते, असे सांगून तिला आडबाजूला उभ्या असलेल्या शिवशाही बसमध्ये नेले. बसमध्ये अंधार होता. तेव्हा त्याने तुम्ही दरवाजा उघडून आत जा, असे सांगितले. तेव्हा ही तरुणी बसमध्ये गेली.

तेव्हा तिच्या मागोमाग तो आत आला. त्याने दरवाजा लावून घेत तिच्यावर बलात्कार केला. या घटनेनंतर ही तरुणी फलटणला जाण्यास निघाली. अर्ध्या वाटेवरुन ती परत आली आणि तिने स्वारगेट पोलीस ठाण्यात या घटनेची माहिती दिली स्वारगेट पोलिसांनी तातडीने तेथील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले. चित्रीकरणात आरोपी निष्पन्न झाला आहे. त्याच्यावर पुणे ग्रामीण पोलिसांमध्ये जबरी चोरीचे दोन गुन्हे दाखल आहेत.

शिक्रापुरात आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी तिघांवर गुन्हा

शिक्रापूर : शिक्रापूर ता. शिरुर येथील सतरा वर्षीय मुलाला वारंवार जातीवाचक शिवीगाळ, दमदाटी करत मारहाण करुन आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी कोंढापुरी येथील शिवानंद लक्ष्मण गायकवाड, प्रतिक गायकवाड, आदी गायकवाड या तिघांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

शिक्रापूर ता. शिरुर येथील राजश्री थोरात २०२४ पूर्वी कोंढापुरी येथे राहत असताना गावातील शिवानंद गायकवाड हा राजश्री यांचा मुलगा रोहित यास तू माझ्या वडिलांबद्दल गावामध्ये काहीही बोलून आमची बदनामी करतो असे म्हणून शिवानंद हा त्याच्या साथीदारांच्या मदतीने रोहितला कारमधून घेऊन जाऊन वेळीवेळी वारंवार जातीवाचक शिवीगाळ, दमदाटी करुन मारहाण करत असल्याने थोरात हे शिक्रापूर येथे राहण्यास आले, मात्र त्यांनंतर देखील शिवानंद याने शिक्रापूर येथे येऊन रोहितला दमदाटी करत त्याला मोबाईलवरुन वारंवार दमदाटी शिवीगाळ केल्याने नैराश्यात गेलेल्या रोहित राजाभाऊ थोरात वय १७ वर्षे रा. शिक्रापूर ता. शिरुर जि. पुणे याने ९ जून २०२४ रोजी घरात गळफास घेऊन आत्महत्या केली, त्यांनतर रोहितचा मोबाईल त्याच्या कुटुंबियांकडे असताना त्यांनी मोबाईलचे मेसेज वेळोवेळी वाचले असता रोहित याने शिवानंद गायकवाड, प्रतिक गायकवाड व आदी गायकवाड यांच्या जाचामुळे आत्महत्या केल्याचे समोर आल्याने नुकतेच

याबाबत राजश्री राजाभाऊ थोरात वय ३५ वर्षे रा. पाटवस्ती शिक्रापूर ता. शिरुर जि. पुणे मूळ रा. उंबरी पारगाव ता. बीड जि. बीड यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी शिवानंद लक्ष्मण गायकवाड, प्रतिक गायकवाड, आदी गायकवाड सर्व रा. कोंढापुरी ता. शिरुर जि. पुणे यांच्या विरुद्ध जातीवाचक शिवीगाळ, दमदाटी तसेच आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले हे करत आहे.

वसंत मोरेंकडून सुरक्षा रक्षक कक्षाची तोडफोड

पुणे : शिवशाही बसमध्ये तरुणीवर झालेल्या बलात्काराच्या घटनेनंतर उबाठा गटाचे नेते वसंत मोरे व त्यांच्या समर्थकांनी स्वारगेट बसस्थानकातील सुरक्षा रक्षक कार्यालयात शिरुन तेथे तोडफोड केली. स्वारगेट बसस्थानकात मंगळवारी पहाटे एका २६ वर्षाच्या तरुणीवर बलात्कार करण्याची घटना समोर आली. त्यातून संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली आहे. पोलिसांनी यातील आरोपी निष्पन्न केला असून त्याचा शोध घेतला जात आहे. विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोर्हे यांनी आज दुपारी स्वारगेट बसस्थानकाला भेट देऊन सर्व माहिती घेतली. त्यानंतर दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास वसंत मोरे व त्यांचे कार्यकर्ते स्वारगेट बसस्थानकात पोहचले. त्या ठिकाणी कपडे, दारुच्या बाटल्या, कंडोम अशा वस्तू सापडल्या. बंद पडलेल्या बसमध्ये दारुच्या बाटल्या सापडल्या. त्याबाबत विचारणा केल्यावर कोणीही उत्तरे देण्यास तेथे नव्हते. त्यामुळे वसंत मोरे व त्यांच्या कार्यकर्त्यांनी सुरक्षारक्षक कार्यालयातील काचा फोडल्या. हा प्रकार घडल्यापूर्वी काही वेळ अगोदर अनेक पोलीस अधिकारी व कर्मचारी स्वारगेट बसस्थानकात उपस्थित होते. परंतु, वसंत मोरे व त्यांचे कार्यकर्ते तोडफोड करत असताना त्यांच्या आजू बाजूला कोणीही पोलीस दिसून येत नव्हते की त्यांना तोडफोड करण्यापासून कोणीही रोखले नाही. हा प्रकार मीडियातून पोलिसांना समजल्यानंतर समोरच असलेल्या पोलीस ठाण्यातून पोलिसांनी धाव घेतली.

महाशिवरात्रीनिमित्त ओतूरच्या श्री कपर्दिकेश्वर मंदिरात गर्दी

ओतूर : महाशिवरात्री निमित्त ओतूर येथील ग्रामदैवत श्री कपर्दिकेश्वर मंदिरात बुधवारी दि.२६ रोजी पहाटे पासून रात्री उशिरा पर्यंत हजारो भाविकांनी शिवलिंगाचे दर्शन घेतल्याची माहिती श्री कपर्दिकेश्वर देव-धर्म संस्थेचे अध्यक्ष अनिल तांबे यांनी दिली. महाशिवरात्री निमित्त ओतूर ता.जुन्नर येथील कपर्दिकेश्वर मंदिरात पहाटे पाच वाजता श्री कपर्दिकेश्वर देव-धर्म संस्थेचे अध्यक्ष अनिल तांबे व सिमा तांबे यांच्याहस्ते अभिषेक व महापुजा करण्यात आली यावेळी महेंद्र (गांधी) पानसरे,जितेंद्र डुंबरे, सागर दाते, अमोल डुंबरे, राजेंद्र डुंबरे, सचिन तांबे,पुजारी गोविंदराव डुंबरे, दत्तात्रय शिंदे यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थीत होते.नंतर आरती करून मंदिर भाविकांना दर्शनासाठी खुले करण्यात आले. येथील ग्रामदैवत श्री कपर्दिकेश्वर मंदिरासमोर महाशिवरात्री निमित्त भाविकांच्या लांबच लांब रांगा लावल्या होत्या. ओतूर आणि परिसरातील दानशूर शिवभक्तांच्या वतीने खिचडी फराळाचे वाटप करण्यात आले. येथी चैतन्य महाराज समाधी मंदिराजवळ प्रजापिता ब्रम्हकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयल ओतूर केंद्राच्या वतीने अध्यात्मिक ईश्वरीय ज्ञान,आत्म्यांचे पारलौकिक परमपिता परमात्मा त्रिमूर्ती शिव निराकार महाशिवरात्रीचे रहस्यशिव परमात्म्याचे दिव्य कर्तव्यस्वयं भूशिव कोण आहेत शिव अवतरण यावरील अधिक माहितीसाठी चित्र प्रदर्शन,तसेच आमरनाथ शिवलिंगाची प्रतिकृती तयार करण्यात आली होती.

भालचंद्र महादेव अष्टेकरच्या आर्थिक गुन्हे शाखेने आवळल्या मुसक्या

पुणे : शेअर मार्केटमध्ये गुंतवणुक करुन जादा परतावा देण्याचे आमिष दाखवून लोकांना गुंतवणुक करण्यास लावून ९ कोटी रुपये घेऊन फरार झालेल्या साई इंडस मार्केटिंग व श्री मल्टी सर्व्हिसेस कंपनीच्या संचालकाला आर्थिक गुन्हे शाखेने अटक केली आहे.

भालचंद्र महादेव अष्टेकर इहरश्रलहरपवीर चरहरवर्शी ीहींशज्ञरी (रा. श्वेता कुंज अपार्टमेंट, वडगाव बुद्रुक) असे अटक केलेल्याचे नाव आहे. लोकांना वेगवेगळ्या तीन स्कीममध्ये गुंतवणुक करण्यास सांगून त्यात मासिक ४ टक्के व्याज देण्याचे आमिष दाखवून सुरुवातीला काही महिने व्याज देऊन नंतर त्याने गाशा गुंडाळून फरार झाला होता. त्याने १२१ जणांची ९ कोटी रुपयांची फसवणुक केली असल्याची मुळ फिर्याद दाखल आहे. परंतु, त्याने जवळपास एक हजार जणांची फसवणुक केली असून त्याची रक्कम जवळपास दीडशे कोटी रुपयांपर्यंत जात असल्याचे फसवणुक झालेल्यांचे म्हणणे आहे.

याबाबत विजयकुमार मुरलीधर घाटे (वय ५३, रा. शिवणे) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांच्या एका व्यावसायिक मित्राने त्यांना साई इंडस मार्केटिंग व श्री मल्टी सर्व्हिसेसमधील गुंतवणुकीवर चांगला परतावा देत असल्याची माहिती दिली. त्यानुसार त्यांनी सुरुवातीला २ लाख रुपये गुंतविले. त्याचे मासिक ४ हजार रुपये व्याज त्यांना लागोपाठ ३ महिने मिळाले. त्यानंतर त्यांनी आणखी मुलाच्या व पत्नीच्या नावावर गुंतवणूक केली. भालचंद्र अष्टेकर याने गुंतविलेल्या मुद्दलाचे त्यांना पोस्टडेटेड चेक दिले. १० ऑक्टोंबर २०२३ रोजी त्याने गुंतवणुकदारांचा मेळावा घेतला. त्यात मोठ्या प्रमाणावर लोक सहभागी झाले होते. त्यानंतर डिसेबर २०२३ पासून परतावा येणे बंद झाले.

कार्यालयात जाऊन चौकशी केल्यावर तेथील कर्मचारी तुमचे पैसे बुडणार नाहीत, कंपनीचे पैसे अडकले आहेत, लवकरच पैसे मिळतील, असे समजावून सांगायचे. एप्रिल २०२४ मध्ये अष्टेकर याने झुम मिटिंग घेऊन सर्वांना लवकरच पैसे मिळतील, पोलिसांकडे जाऊ नका, पोलिसांकडे गेल्यावर कोणाचेच पैसे मिळणार नाही, असे सांगितले. त्यानंतर भालचंद्र अष्टेकर याच्या कार्यालयातील लोक कार्यालय बंद करुन निघून गेले. अष्टेकर याचा मोबाईलही बंद होता. त्याची वेबसाईटही मे २०२४ पासून बंद झाली होती. त्यामुळे फिर्यादी यांनी चौकशी केल्यावर त्यांना १२१ लोकांची ९ कोटी २ लाख ७३ हजार ८०० रुपयांची फसवणूक झाल्याचे समजले. त्यांनी आर्थिक गुन्हे शाखेत याची फिर्याद दिली. ६ सप्टेंबर २०२४ रोजी याचा गुन्हा दाखल करण्यात आला. आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षक दीपाली भुजबळ (झख ऊशशरिश्रळ इर्हीक्षलरश्र) या गुन्ह्याचा तपास करीत आहेत.

याबाबत विजयकुमार घाटे यांनी सांगितले की, आम्ही माहिती घेतली व गुन्हा दाखल केला तेव्हा १२१ जणांची ९ कोटी रुपयांची फसवणुक झाल्याचे लक्षात आले होते. परंतु, त्याने जवळपास १ हजार जणांची सुमारे दीडशे कोटी रुपयांची फसवणूक केल्याचे समजते. गेले पाच महिने तो फरार होता. आम्ही वारंवार पोलिसांकडून माहिती घेण्याचा प्रयत्न करत होतो. परंतु, तपासाबाबत काही माहिती मिळत नव्हती. शेवटी मंगळवारी पोलिसांनी फोन करुन भालचंद्र अष्टेकर याला अटक केल्याची माहिती दिली.

एल्&टी फायनान्स लिमिटेड
(आधीचे नाव, एल्&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड)
नोंदणीकृत कार्यालय: एल्&टी फायनान्स लिमिटेड, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरुम जवळ, सांताक्रूझ (पू), मुंबई 00 098
CIN No.: L67120MH2008PLC181833
शाखा कार्यालय: पुणे

L&T Finance

गहाण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी सार्वजनिक लिलाव

एल अँड टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 [54 ऑफ 2002] आणि या कायद्यांतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा लिलाव करत आहे. **"आधार कुठे आहे" आणि "जशी स्थिती आहे तशी"** त्याची देय रक्कम आणि पुढील व्याज, शुल्क आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **"सार्वजनिक लिलाव"** च्या मार्गाने.

कर्जदार आणि सह-कर्जदाराचं नाव	तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता	कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक)	भौतिक ताबा घेतला	बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये)	एकूण शिल्लक थकबाकी 02.01.2024 नुसार	आरक्षित किंमत (रुपयांमध्ये)	आरंभाची तारीख	लिलावाची तारीख आणि वेळ
1. राजेश एकनाथ पवार 2. अमर एकनाथ पवार 3. गिरीजा एकनाथ पवार 4. शंकरराव पवार कोपऱ्यात बसलेले (त्याचे भागीदार राजेश मार्फत एकनाथ पवार, गिरीजा एकनाथ पवार, अमर एकनाथ पवार)	मालमत्तेचा सर्व तुकडा आणि पार्सल पत्ता: फ्लॅट क्र. 102, सुमारे 133.83 स्क्वेअर मीटर म्हणजे 1440 स्क्वेअर फूट बांधलेले क्षेत्र, सुख शांती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बिल्डिंगमध्ये, ज्याचे बांधकाम सर्व्हे. क्रमांक 453/र-1-3 (जुना क्रमांक 2-3) आहे. 1004, नाना पेठ, पुणे, महसुली गावाच्या सुमारे 660.54 चौरस मीटरचे मोजमाप, समान क्षेत्र आणि सुविधेमध्ये अविभक्त वाटा आणि व्याजासह, जे पुणे महानगरपालिकेच्या स्थानिक मर्यादेत आणि नोंदणी उपजिल्हा तालुका हवेली, पुणे यांच्या कार्यक्षेत्रात आहे.	H18488230621112650 / H18488260621030210	28 डिसेंबर 2024	रु. 11,46,240/-	रु. 2,17,63,619.15/-	रु. 1,14,62,400/-	सर्व कामकाजाच्या दिवशी सकाळी 10.00 ते संध्याकाळी 5.30 या वेळेत पूर्व भेटीसह	31.03.2025 दुपारी 12:30 ते दुपारी 2.00 पर्यंत

सावजनिक लिलावाच्या अटी आणि नियम

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.auctiontiger.net/EPROC/ वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **29/03/2025** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुराव्यांच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10% परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी एलटीएफ द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **31/03/2025** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **01/04/2025** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुदींनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेच्या परीक्षणासाठी किंवा अधिक माहितीसाठी, संभाव्य बोलीदार प्राधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधू शकतात ज्याचे **नाव : शेखर काळे, एल & टी फायनान्स लि., ऑफिस क्र. 301, 3रा मजला, झेनिथ कॉम्प्लेक्स, साकार संकुलाजवळ, शिवाजी नगर, पुणे - 411005 आणि संतोष तिवारी, एल & टी फायनान्स लि., वृंदावन इमारत, प्लॉट क्र. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सीडीस शोरूम जवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400 098, संपर्क क्र. 022-68076666.** ई-लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, प्राधिकृत अधिकारी कोणतेही कारण न देता किंवा कोणतीही पूर्व सूचना न देता बोली /प्रस्ताव स्वीकारू/नाकारू/बदलू/रद्द करू शकतो किंवा ई-लिलाव पुढे ढकलू शकतो.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8 (6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक)/सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

दिनांक: 27.02.2025
ठिकाण: पुणे

स्वाक्षरी/-
अधिकृत अधिकारी
करिता एल्&टी फायनान्स लिमिटेड

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अशोक विठ्ठल सोनवणे यांनी शितल प्रिंटर्स, भूषणनगर, पोस्ट केडगाव (देवी) तालुका आणि जिल्हा अहमदनगर पिन-४१४००१ (महाराष्ट्र) येथे दैनिक लोकमंथन मुद्रित केले. व ४३१ सोमवार पेठ, सिद्धीविनायक केशर पुणे पिन नंबर ४११०११ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. * व्यवस्थापकीय संपादक - रंजन साळवी. RNI : MAHMAR/2011/40983. Email - lokmanthan.pune@gmail.com